# स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण, आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

## प्रेसनोट

दिनांक:- १९/०२/२०१७

### अवैधरित्या मद्याची वाहतुक करणारे इसमांवर स्थागुशाचे पथकाचा छापे

---

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सा़ो** यांनी आदेशित केले प्रमाणे जिल्हयातील अवैध धंदयाचे समुळ उच्चाटन होणेसाठी अवैधरित्या मद्याची वाहतुक व विक्री करणारे, तसेच हातभट्टीची गावठी दारू तयार करणारे इसमांवर सत्वर कारवाई करण्यात येत आहे. त्यानुसार **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी स्थागुशाचे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना अवैध धंदयांवर छापे टाकणेसाठी सुचना दिल्या आहे.

त्याप्रमाणे दिनांक १८/०२/२०१८ रोजी स्थागुशाचे पथकातील अधिकारी व कर्मचारी अवैध धंदयांवर कारवाई करणेसाठी त्रंबकेश्वर पोलीस ठाणे हद्दीत गस्त घालत होते. दरम्यान स्थागुशाचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांना मिळालेल्या गुप्त माहितीप्रमाणे, काही इसम हे जव्हार ते त्रंबकेश्वर रोडने विनापरवाना चोरटया रितीने देशी व विदेशी मद्याची वाहतुक व विक्री करतात बाबत समजले. त्याप्रमाणे स्थागुशाचे पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी त्रंबकेश्वर हद्दीतील आंबोली ते वेळुंजे जाणारे रोडवर सापळा रचुन एक सफेद रंगाची इंडिका कार क्र. एम.एच.०४.ई.एस.०१७० हे वाहन अडविले, सदर वाहनावरील चालक नामे **१) शेख नफिस शेख इकबाल, रा. टाकळी, पो.खुलताबाद, जि.औरंगाबाद, व** त्याचा साथीदार **२) महेश माधव कांबळे, रा. एम.आयटी.रोड, नागसेन नगर, औरंगाबाद** यांना ताब्यात घेवुन वाहनाची झडती घेतली असता २३,४७२/- रू. चा विदेशी मद्याचा अवैध मद्यसाठा मिळुन आला. सदर इसमांनी दादरानगर हवेली येथील विदेशी दारूचा मद्यसाठा हा महाराष्ट्र राज्यात विक्रीसाठी निर्बंध असतांना देखील कोठेतरी विक्री करण्याचे उद्देशाने वाहतुक करतांना मिळुन आले असुन त्यांचेविरूध्द त्रंबकेश्वर पोलीस ठाणेस मुंबई दारूबंदी कायदा कलम ६५(ई)(ए)ए ८१,८३,९० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर इसमांचे कब्जातुन इंडिका कारसह एकुण **१,७३,४७२ रू. चा मुद्देमाल** हस्तगत करण्यात आला आहे.

मा. पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सा़ो यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे, पोलीस उपनिरीक्षक श्री. मच्छिंद्र रणमाळे, पोहवा राजु दिवटे, पोना जालिंदर खराटे, पोकॉ लहु भावनाथ, कपालेश्वर ढिकले अशांचे पथकाने सदर कारवाई केली आहे. जिल्हयातील अवैध धंदयांचे समुळ उच्चाटन होणेसाठी आगामी काळात अवैध धंदयांवर सतत कारवाई सुरू राहणार आहे.